ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ३० डिसेंबर, १९५९ अंक ४८

## विविध माहिती

**३५ कोटी रेडिओंची जरूरी**—जगांतील लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकांना स्थानिक रेडिओवर होणारे कार्यक्रम ऐकण्यासाठी लागणारे रेडिओसुद्धां उपलब्ध नाहींत. ह्या लोकांपैकी बहुसंख्य लोक आशिआ व आफ्रिका खंडांतील आहेत. ह्या सर्वांना रेडिओ सेटस् पुरवावयाचे झाल्यास ३५ कोटी रेडिओ लागतील. ही संख्या जगांतील सध्यांच्या रेडिओ सेटसूइतकी आहे.

**साखरेवरील नियंत्रण काढा**—इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनच्या अध्यक्षांनीं भारत सरकारला साखरेवरील नियंत्रण काढून टाकण्याची विनंती केली आहे. असें केल्यास ऊंसवाल्या शेतकऱ्यांना अधिक किंमत देऊन साखर कारखान्यांना अधिक ऊंस मिळवितां येईल व त्यामुळें उत्पादन वाढेल असें अध्यक्षांचे म्हणणें आहे.

**नवीन रेल्वेमार्गाचें उद्‌घाटन**—खांडवा-हिंगोली रेल्वेमार्गावरील आणखी एका विभागाचें उद्‌घाटन भारताचे रेल्वे मंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनीं केलें. अकोला ते कान्हरगांवपर्यंत जाणारा हा विभाग ६३ मैल लांबीचा आहे. संपूर्ण मार्ग तयार झाल्यावर उत्तर व दक्षिण भारतामधील अरुंद रुळाचे मार्ग जोडले जातील.

**लोकशाही मानवणार नाहीं**—पाकिस्तानची घटना तयार करण्यासाठी नेमण्यांत यावयाच्या घटना कमिशननें वयात आलेल्या व्यक्तींना मताधिकार द्यावा अशी सूचना केली, तरी पाकिस्तानचे मध्यवर्ती सरकार ती मानणार नाहीं, असें प्रेसिडेंट अयुबखान ह्यांनीं एका सभेंत सांगितलें. त्यांच्या मतानें पार्लमेंटरी लोकशाही पाकिस्तानच्या जनतेला मानवणारी नाहीं.

**कुटुंबनियोजनाची आवश्यकता**— दर हजारीं जननाचें प्रमाण व दर हजारी मृत्यूचें प्रमाण ह्यांच्यांतील सध्यांची तफावत कुटुंबनियोजनाचा अवलंब करून कमी करण्यांत आली नाहीं तर भारताला भरमसाठ लोकसंख्येच्या भयानक परिणामाला तोंड द्यावें लागेल असें मत श्री. आर. ए. गोपालन् ह्यांनीं व्यक्त केलें आहे. श्री. गोपालन् हे माजी शिरगणती कमिशनर आहेत.

**संशोधनाचें प्रादेशिक केंद्र**— भारत सरकारच्या शास्त्रीय संशोधनखात्यानें आसाममध्यें जोरहाट येथें एक प्रादेशिक संशोधनकेंद्र स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या केंद्रांत तेल, नैसर्गिक वायु, कोळसा आणि जंगलांत सांपडणारे पदार्थ ह्यांच्या बाबतींत संशोधन केलें जाणार आहे. केंद्रांतर्फे शास्त्रीय विषयावरील पुस्तकेंहि प्रकाशित केलीं जाणार आहेत.

**मोटारींना लागणारे सुटे भाग**— तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मध्याच्या सुमारास मोटारींना लागणारे बहुतेक महत्त्वाचे सुटे भाग भारतांतच तयार होऊं लागतील अशी माहिती उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं लोकसभेंत सांगितली. असे सुटे भाग तयार करण्यासाठीं ज्या कारखान्यांना परवाने देण्यांत आले आहेत ते कारखाने १९६१ च्या सुमारास प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ करतील असा त्यांचा अंदाज आहे.

**हॉलंडकडून विमानांची खरेदी**—इंडिअन एअर लाइन्स कॉर्पोरेशन हॉलंडकडून जेटवर चालणारीं ५ विमानें विकत घेण्याचा करार करणार आहे. भारताला विमानांची किंमत रोखीनें द्यावी लागणार नाहीं. विमानांच्या किंमतीइतकी लोखंडांची व मँगेनीझची माती हॉलंड भारताकडून विकत घेणार आहे. विमानांची किंमत सुमारें २ कोटी रुपये होईल.

**सुएझच्या कालव्याची सुधारणा**— संयुक्त अरब प्रजासत्ताक राज्यानें सुएझच्या कालव्याची सुधारणा करण्यासाठी जागतिक बँकेकडे कर्जाची मागणी केली होती. बँकेच्या कार्यकारी मंडळाची बैठक भरून तींत ह्या कामासाठी सुमारें २ कोटी पौंडाचें कर्ज मंजूर करण्यांत आलें. कर्जाचा उपयोग करून सुएझचा कालवा अधिक खोल व रुंद करण्यांत येणार आहे. कालव्यांतील वाहतूक वाढत चालली आहे.

**हिंदी ज्ञानकोशाचें प्रकाशन**— काशी नागरी प्रचारिणी सभा ह्या संस्थेतर्फे हिंदी ज्ञानकोशाचें काम चालू आहे. संकल्पित ज्ञानकोशाचे १० खंड होणार आहेत. त्यांपैकी पहिला खंड पुढील वर्षाच्या मार्च महिन्यांत प्रसिद्ध होणार आहे. ह्या खंडांत १,४०० विषय असतील व त्याचीं ५०० पानें असतील. किंमत मात्र १० रुपयांपेक्षा अधिक असणार नाहीं.

**खाणीविषयक कॉर्पोरेशन**—काश्मीरच्या सरकारनें खाणी व खनिज पदार्थ ह्यांच्या उत्पादनासाठी एक कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनचें भांडवल ५ कोटी रुपये असेल. भांडवल ५०,००० भागांत विभागण्यांत येणार असून सर्व भाग सरकारच घेणार आहे. राज्यांतील कोळशाच्या खाणींकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येणार आहे.

**रेल्वेतज्ज्ञांची पहाणी**—इंटरनॅशनल रेल्वे काँग्रेस असोसिएशनच्या स्थायी समितीचे कांहीं सभासद मुंबईला आले होते. मुंबई ते लोणावळा ह्या मार्गावरील विजेच्या रेल्वेरस्त्याची ते पहाणी करणार आहेत. स्थायी समितीच्या ६ व्या बैठकीसाठी ते मुंबईला आले होते. सभासदांत बरेच परदेशीय तज्ज्ञ आहेत.

## नव महाराष्ट्र

"आजच्या मुंबई राज्याचे महाराष्ट्र आणि गुजराथ हीं दोन राज्यें निर्माण करण्याचा काँग्रेस कार्यकारिणीनें जो निर्णय घेतला त्याचें देशांत अन्यत्र आणि विशेषतः मुंबई राज्यांतील लोकांकडून हार्दिक स्वागत झालें. एकभाषिक राज्यें निर्माण करण्याचें कार्य आतां पूर्ण होईल. अशा राज्याची कल्पना राष्ट्रीय चळवळींतून पुढें आली व ती लोकांच्या मनांत खोलवर रुजून राहिली. राष्ट्रीय नेत्यांना तीन वर्षांच्या अनुभवावरून असें पटलें कीं, अस्वाभाविक असें सध्यांचें मुंबई राज्य हें कांहीं कायमचा राष्ट्रीय तोडगा होऊं शकत नाहीं. त्यांनीं लोकमतास मान देऊन त्यांच्या भावना विचारांत घेण्याचें ठरविलें. सव्वीस मराठी भाषिक जिल्हे मिळून होणाऱ्या या नवीन मराठी राज्याचा विस्तार स्थूलमानानें १,१९,०२५ चौरस मैल असेल व लोकसंख्या ३,२१,००,००० च्यावर होईल. ह्या राज्याच्या निर्मितीमुळें अत्यंत जरूर असलेली भावनात्मक एकात्मता घडून येईल आणि नवीन विधायक कार्याच्या नव्या पर्वास सुरुवात होईल. तेव्हां आपण आपली बुद्धि, कार्यशक्ति आणि उत्साह हें सर्व आपलें राज्य शेती, उद्योग, व्यापार, दळणवळण, शिक्षण, सामाजिक सुधारणा इ. क्षेत्रांत व राष्ट्राच्या सर्वांगीण जीवनांत प्रगत आणि आदर्श ठेवण्यासाठीं उपयोग करूंया. झाल्या गेल्या गोष्टी आपण विसरून सर्वजण आपापल्या परीनें महाराष्ट्राच्या विकासासाठीं प्रयत्न करून असें पटवून देऊंया कीं अंतिमतः भाषिक राज्यामुळें राष्ट्रीय ऐक्य अधिकाधिक वाढत जाईल.

"उदारता, कठीण काळांत त्यागवृत्ति, विपत्तींत एकत्रित येणें आणि राष्ट्राच्या हाकेस धांवून जाणें या गोष्टींची इतिहास-परंपरा आपणांत आहे. आणि आतां नवीन राज्य स्थापन झाल्यावर आपण सर्वांनीं आपापली जबाबदारी पार पाडण्यास हिरिरीनें पुढें येऊन आपल्या निढळाच्या घामानें, श्रमानें व उत्स्फूर्त उत्साहानें आपलें राज्य सर्वोत्तम बनवूं या.

"मराठी भाषा नसलेल्या महाराष्ट्रांतील व्यापारी समाजास मला एक विनंती करावयाची आहे. त्यांच्या मनांत जर कांहीं साशंकता असेल तर मी त्यांना असें आश्वासन देऊं इच्छितों कीं, त्यांच्या शांततामय आणि प्रगतिशील व्यापार-उद्योग आदि व्यवसायांस कांहींहि धोका नाहीं. माझी खात्री आहे कीं, त्यांना अशा वातावरणाचाच प्रत्यक्षांत लवकरच अनुभव येईल आणि म्हणून मी अशी विनंती करतों कीं, आपली भाषा कोणतीहि असो; आपण सर्वांच्या हितासाठीं एकत्रपणें महाराष्ट्राचा व्यापार-उदीम वाढवूं या.

"सरहद्दीचे प्रश्न याच वेळेला निकालांत काढून टाकले म्हणजे त्यापासून पुढें कटकटी निर्माण न होऊन राज्यव्यवस्था व देशाची प्रगति यांत अडथळे येणार नाहींत. सरहद्द ठरवितांना कांहीं तत्त्वें गृहित धरून त्या आधारें सरहद्दींचे प्रश्न मिटविण्यासाठीं एक स्वतंत्र कमिशन नेमण्यांत यावें. या पद्धतीनें विवाद्य विभागांचा प्रश्न एकदांचा निकालांत निघण्यास थोडा जास्त वेळ लागण्याची शक्यता आहे खरी पण त्याचबरोबर असे निर्णय तत्त्वाच्या आधारावर, सुलेपणानें आणि पूर्ण चौकशीनंतर घेतले गेल्यास त्यास सर्वांची मान्यता सहज मिळेल."

(महाराष्ट्र चेंबरच्या वार्षिक सभेंत श्री. कृ. ह. ढमढेरे ह्यांचें अध्यक्षीय भाषण.)

## नवीन राज्यांच्या राजधान्यांसाठी जमिनीचा ताबा

मुंबई राज्यासाठीं १८९४ च्या जमीन ताब्यांत घेण्याबावतच्या कायद्यामध्यें व त्यांच्या अंमलबजावणीमध्यें दुरुस्ती करण्याचें योजिलें आहे.

सध्यांच्या मुंबई राज्याची पुनर्रचना करण्यांत येणार असल्यानें नवीन राज्यांच्या राजधान्यांसाठीं लागणारी जमीन योग्य त्या बाजारभावानें विकत घेण्याकरितां उपाययोजना करतां यावी म्हणून ही दुरुस्ती करण्यांत येणार आहे.

याबाबतचें आवश्यक तें विधेयक मुंबई सरकारच्या दिनांक १० डिसेंबरच्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

सध्याच्या मुंबई राज्याची पुनर्रचना करण्यांत येणार असल्यानें नवीन राज्यांच्या राजधान्यांसाठीं व नवीन राज्य सरकारांच्या मुख्य ठाण्यांचा विकास करण्याच्या दृष्टीनें आवश्यक ती तरतूद करणें आवश्यक आहे असें या विधेयकामागील उद्देश व कारणें याबाबतच्या निवेदनांत सांगण्यांत आलें आहे. ह्यासाठीं सवतीनें जमिनीचा कबजा घेणें आवश्यक होईल.

मुंबई राज्याचें विभाजन करण्याबावत फेरविचार करण्यांत येण्याची शक्यता असल्याचें वृत्त प्रथम वर्तमानपत्रांमध्यें प्रसिद्ध झाल्यानंतर नवीन राज्यांच्या राजधान्या आणि मुख्य ठाणीं यासाठीं ज्या जागांची निवड करण्याची शक्यता आहे अशा विभागांतील जमिनींच्या बाजारांतील किंमती त्या विभागांतील जमिनींच्या वायदे व्यवहारामुळें वाढण्याची शक्यता आहे. तेव्हां वर निर्देशिलेल्या कारणासाठीं त्या जमिनीचा असेर ताबा घेण्यांत येईल. ती योग्य बाजारभावानें म्हणजे त्या जमिनीचा सट्टा सुरू होण्यापूर्वींच्या किंमतीला मिळवितां यावी या दृष्टीनें उपाययोजना करणें जनतेच्या दृष्टीनें हितावह आहे.

१८९४ चा जमीन ताब्यांत घेण्याबावतचा कायदा मुंबई राज्यास लागू करण्यासाठीं १९४८ च्या जमीन ताब्यांत घेण्याबावतच्या (मुंबई दुरुस्ती) कायद्यांतील तरतुदींच्या धर्तीवर तरतुदी करण्याचें योजिलें आहे. यामुळें ज्या जमिनीचा ताबा घेण्यांत येईल त्या जमिनीची किंमत कलम ४, उपकलम (१) अनुसार नोटिफिकेशन प्रसिद्ध करण्यांत आलेली तारीख अथवा इतर योग्य ती तारीख, यांपैकीं जी तारीख पूर्वींची असेल त्या तारखेपूर्वीं असलेल्या किंमतीएवढी समजण्यांत येईल. या बाबतींत योग्य ती तारीख म्हणजे जुलै १९५९ ची पहिली तारीख होय, अशीहि तरतूद करण्याचें योजिलें आहे.

---

### पाकिस्तानी कपाशीची आयात

भारत-पाकिस्तान करारानुसार भारतानें पाकिस्तानांतून सुमारें १ कोटि रुपयांची १" व त्याखालील कपास आयात करण्यास संमति दिली आहे. म्हणजे, प्रत्येकी ४०० पौंडांच्या सुमारें २०,००० गासड्यांची आयात होईल.

---

### ताजमहालाचीं कारंजीं पुनः सुरू होणार

ताजमहालाचीं कारंजीं गेलीं तीस वर्षें बंद पडलीं आहेत, तीं आतां पुनः सुरू करण्यांत येणार आहेत. ताजमहालाच्या सौंदर्यांत व आकर्षणांत भर घालण्याच्या कार्यक्रमाचा तो एक भाग आहे. ताजमहालाच्या भोंवतीं हिरवळ लावण्यांत येत आहे; येण्या-जाण्याचे रस्तेहि सुधारले जातील.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

ARTHA (Commercial Weekly) Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख ३० डिसेंबर, १९५९ | अंक ४८

## विविध माहिती

**३५ कोटी रेडिओंची जरूरी**—जगांतील लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकांना स्थानिक रेडिओवर होणारे कार्यक्रम ऐकण्यासाठी लागणारे रेडिओसुद्धां उपलब्ध नाहींत. ह्या लोकांपैकी बहुसंख्य लोक आशिआ व आफ्रिका खंडांतील आहेत. ह्या सर्वांना रेडिओ सेटस् पुरवावयाचे झाल्यास ३५ कोटी रेडिओ लागतील. ही संख्या जगांतील सध्यांच्या रेडिओ सेटसइतकी आहे.

**साखरेवरील नियंत्रण काढा**—इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनच्या अध्यक्षांनीं भारत सरकारला साखरेवरील नियंत्रण काढून टाकण्याची विनंती केली आहे. असें केल्यास ऊंसवाल्या शेतकऱ्यांना अधिक किंमत देऊन साखर कारखान्यांना अधिक ऊंस मिळवितां येईल व त्यामुळें उत्पादन वाढेल असें अध्यक्षांचे म्हणणें आहे.

**नवीन रेल्वेमार्गाचें उद्घाटन**—खांडवा-हिंगोली रेल्वेमार्गावरील आणखी एका विभागाचें उद्घाटन भारताचे रेल्वे मंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनीं केलें. अकोला ते कान्हरगांवपर्यंत जाणारा हा विभाग ६३ मैल लांबीचा आहे. संपूर्ण मार्ग तयार झाल्यावर उत्तर व दक्षिण भारतामधील अरुंद रुळाचे मार्ग जोडले जातील.

**लोकशाही मानवणार नाहीं**—पाकिस्तानची घटना तयार करण्यासाठी नेमण्यांत यावयाच्या घटना कमिशननें वयात आलेल्या व्यक्तींना मताधिकार द्यावा अशी सूचना केली, तरी पाकिस्तानचे मध्यवर्ती सरकार ती मानणार नाहीं, असें प्रेसिडेंट अयुबखान ह्यांनीं एका सभेंत सांगितलें. त्यांच्या मतानें पार्लमेंटरी लोकशाही पाकिस्तानच्या जनतेला मानवणारी नाहीं.

**कुटुंबनियोजनाची आवश्यकता**— दर हजारीं जननाचें प्रमाण व दर हजारी मृत्यूचें प्रमाण ह्यांच्यांतील सध्यांची तफावत कुटुंबनियोजनाचा अवलंब करून कमी करण्यांत आली नाहीं तर भारताला भरमसाठ लोकसंख्येच्या भयानक परिणामाला तोंड द्यावें लागेल असें मत श्री. आर. ए. गोपालन् ह्यांनीं व्यक्त केलें आहे. श्री. गोपालन् हे माजी शिरगणती कमिशनर आहेत.

**संशोधनाचें प्रादेशिक केंद्र**— भारत सरकारच्या शास्त्रीय संशोधनखात्यानें आसाममध्यें जोरहाट येथें एक प्रादेशिक संशोधनकेंद्र स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या केंद्रांत तेल, नैसर्गिक वायु, कोळसा आणि जंगलांत सांपडणारे पदार्थ ह्यांच्या बाबतींत संशोधन केलें जाणार आहे. केंद्रांतर्फे शास्त्रीय विषयावरील पुस्तकेंहि प्रकाशित केलीं जाणार आहेत.

**मोटारींना लागणारे सुटे भाग**— तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मध्याच्या सुमारास मोटारींना लागणारे बहुतेक महत्त्वाचे सुटे भाग भारतांतच तयार होऊं लागतील अशी माहिती उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं लोकसभेंत सांगितली. असे सुटे भाग तयार करण्यासाठीं ज्या कारखान्यांना परवाने देण्यांत आले आहेत ते कारखाने १९६१ च्या सुमारास प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ करतील असा त्यांचा अंदाज आहे.

**हॉलंडकडून विमानांची खरेदी**—इंडिअन एअर लाइन्स कॉर्पोरेशन हॉलंडकडून जेटवर चालणारीं ५ विमानें विकत घेण्याचा करार करणार आहे. भारताला विमानांची किंमत रोखीनें द्यावी लागणार नाहीं. विमानांच्या किंमतीइतकी लोखंडाची व मँगेनीझची माती हॉलंड भारताकडून विकत घेणार आहे. विमानांची किंमत सुमारें २ कोटी रुपये होईल.

**सुएझच्या कालव्याची सुधारणा**— संयुक्त अरब प्रजासत्ताक राज्यानें सुएझच्या कालव्याची सुधारणा करण्यासाठी जागतिक बँकेकडे कर्जाची मागणी केली होती. बँकेच्या कार्यकारी मंडळाची बैठक भरून तींत ह्या कामासाठी सुमारें २ कोटी पौंडाचें कर्ज मंजूर करण्यांत आलें. कर्जाचा उपयोग करून सुएझचा कालवा अधिक खोल व रुंद करण्यांत येणार आहे. कालव्यांतील वाहतूक वाढत चालली आहे.

**हिंदी ज्ञानकोशाचें प्रकाशन**— काशी नागरी प्रचारिणी सभा ह्या संस्थेतर्फे हिंदी ज्ञानकोशाचें काम चालू आहे. संकल्पित ज्ञानकोशाचे १० खंड होणार आहेत. त्यांपैकी पहिला खंड पुढील वर्षाच्या मार्च महिन्यांत प्रसिद्ध होणार आहे. ह्या खंडांत १,४०० विषय असतील व त्याचीं ५०० पानें असतील. किंमत मात्र १० रुपयांपेक्षा अधिक असणार नाहीं.

**खाणीविषयक कॉर्पोरेशन**—काश्मीरच्या सरकारनें खाणी व खनिज पदार्थ ह्यांच्या उत्पादनासाठी एक कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनचें भांडवल ५ कोटी रुपये असेल. भांडवल ५०,००० भागांत विभागण्यांत येणार असून सर्व भाग सरकारच घेणार आहे. राज्यांतील कोळशाच्या खाणींकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येणार आहे.

**रेल्वेतज्ज्ञांची पहाणी**—इंटरनॅशनल रेल्वे काँग्रेस असोसिएशनच्या स्थायी समितीचे कांहीं सभासद मुंबईला आले होते. मुंबई ते लोणावळा ह्या मार्गावरील विजेच्या रेल्वेरस्त्याची ते पहाणी करणार आहेत. स्थायी समितीच्या ६ व्या बैठकीसाठी ते मुंबईला आले होते. सभासदांत बरेच परदेशीय तज्ज्ञ आहेत.

**प्रमुख बँकर्सची पाकिस्तान व भारत ह्यांची आगामी भेट**

जागतिक बँकेचे चेअरमन, मि. युजेन ब्लॅक, ह्यांच्या सूचनेवरून ग्रेटब्रिटन, अमेरिका आणि प. जर्मनी येथील कांहीं प्रमुख बँकर्स भारत आणि पाकिस्तान ह्या देशांचा दौरा करून त्यांच्या आर्थिक गरजांचा अभ्यास करणार आहेत. औद्योगिक राष्ट्रांना अविकसित राष्ट्रांच्या पुढील प्रश्नांचें अधिक चांगलें आकलन होणें आवश्यक आहे, आणि ह्यादृष्टीनें अशा औद्योगिक व व्यावसायिक पुढाऱ्यांच्या भेटी उपयुक्त ठरतील, असें मि. ब्लॅक ह्यांचें म्हणणें आहे. भारत व पाकिस्तान सरकारांनीं मि. ब्लॅक ह्यांच्या सूचनेचें हार्दिक स्वागत केलें असून सर्व प्रकारचें सहकार्य देऊं केलें आहे. सर ऑलिव्हर फ्रॅक्स (लंडन येथील लॉइड्स बँकेचे चेअरमन आणि वॉशिंग्टन येथील भूतपूर्व ब्रिटिश वकील) मि. जोसेफ एम. डॉज (यु. स्टेट्स बजेट ब्यूरोचे भूतपूर्व डायरेक्टर आणि सध्यां डेट्रॉइट बँक व ट्रस्ट कंपनीचे चेअरमन) आणि डॉ. हरमान जे. ॲब्स (डॉइश बँकेचे एक डायरेक्टर आणि प. जर्मनीमधील एक प्रमुख बँकर) हे येत्या फेब्रुवारी व मार्चमध्यें ह्या कामासाठी भारतांत व पाकिस्तानांत येत आहेत.

---

**डॉलर विभागांतून आयात करण्याबाबत निर्बंध नाहीं**

डॉलर विभागांतून मालाची आयात करण्यासंबंधांतील उरलेले निर्बंध काढून टाकण्याच्या प्रश्नावर भारत सरकारचा सतत विचार चालू होता. भांडवली माल सोडून इतर वस्तूंची आयात डॉलरेतर विभागांतूनच केली पाहिजे असा निर्बंध ठेवण्याची आवश्यकता नाहीं अशी स्थिति आतां असल्याचें सरकारला वाटतें. म्हणून सुलभ चलनविभागांतून भांडवली माल वगळून इतर वस्तू आणण्यासाठी दिलेल्या परवान्यांवरील पूर्ण रकमेच्या किंमतीइतका माल डॉलर विभागांतूनहि आयात करण्यास व्यापाऱ्यांना परवानगी दिल्याचें आयात-व्यापार नियंत्रणविषयक सूचनापत्रकांत म्हटलें आहे. यामुळें आयातीसाठी डॉलर विभाग व खुला चलन विभाग असा भेद उरलेला नाहीं. तथापि निरनिराळ्या देशांत खरेदीसाठी उपलब्ध असलेल्या परकीय चलनाचा विचार करतां भारी किंमतीचा भांडवली माल आयात करण्याबाबतचे निर्बंध चालूच राहतील म्हणून अशा मालाची आयात कोणत्या देशांतून करावी तें दिलेल्या आयात परवान्यांत नमूद केलें जाईल.

---

**पीपल्स को. बँक, जळगांव, चा रौप्यमहोत्सव**

जळगांव येथील पीपल्स को. बँकेचा रौप्यमहोत्सव रविवार, दि. २० रोजीं श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. श्री. मेहता ह्यांनीं सहकारी पद्धतीनें समाजवादी अर्थरचना घडवून आणण्याचें महत्त्व विशद केलें, आणि संस्थापक चेअरन रावसाहेब रुपचंद मोतिराम आणि सध्याचे चेअरमन श्री. रामदास लहानु पाटील, ह्यांच्या कार्याचा गौरवपर उल्लेख केला.

---

**जागतिक शेतकी प्रदर्शनानिमित्त पोस्टाचें खास तिकिट**

भारतीय टपाल व तारखात्यानें जागतिक शेतकी प्रदर्शनानिमित्त १० डिसेंबर १९५९ रोजीं पोस्टाचें १५ नया पैशांचें खास तिकिट काढण्याचें ठरविलें आहे.

**कागदाच्या कारखान्यासाठी परवाना**—मद्रास राज्यांत खाजगी मालकीचा एक कागदाचा कारखाना काढण्याची परवानगी भारत सरकारकडे मागण्यांत आली आहे. संकल्पित कारखान्याची रोजची उत्पादनशक्ति ५० ते ६० टन असेल. सरकार परवानगी-अर्जाचा विचार करीत आहे. भारतामधील कागदाची टंचाई लक्षांत घेतां कागद-कारखान्याला चांगलें भवितव्य आहे.

**जपानी कारखान्याची मागणी**—जपानमधील एका पोलादाच्या कारखान्यानें भारताकडून ९०,००० टन पोलाद आयात करण्याचें ठरविलें आहे. कारखान्यांचें स्वतःचें उत्पादन अपुरें पडत असल्यामुळें हा निर्णय घेण्यांत आला आहे. कारखान्याची विस्तारयोजना कांहीं कारणानें अंमलांत येऊं शकली नाहीं. मात्र जपानच्या कांहीं कारखान्यांचा ह्या आयातीला विरोध आहे.

**अन्नखात्याच्या मंत्र्याची दशा**—अन्नखात्याचे मंत्री श्री. स. का. पाटील एका प्रसंगीं म्हणाले कीं, अन्नखात्याचें मंत्रिपद हें सर्वच देशांत डोकेंदुखी उत्पन्न करणारें आहे असें दिसतें. ज्या देशांत विपुल अन्न आहे तेथें तरी अन्नखातें तसें असणार नाहीं असें वाटत होतें. पण ज्या देशांत भरपूर अन्न पिकतें तेथेंहि अन्नमंत्र्याला डोकेंदुखी जडतेच.

**मध्यप्रदेश सरकारी नौकरांची मागणी**—मध्यप्रदेशांतील सरकारी नौकरांनीं केलेल्या मागण्यांत महागाई भत्त्यांत वाढ करण्याची मागणी आहे. नौकरसंघटनेच्या अध्यक्षांनीं असें जाहीर केलें आहे कीं, सरकारनें मध्यवर्ती नौकरांना मिळणारा २२ रुपयांचा महागाई भत्ता तातपुरती मदत म्हणून जाहीर करावा. मध्यप्रदेश सरकारचें तिसऱ्या श्रेणींतील नौकर संपावर गेले आहेत.

**विमानाच्या भाड्यांत कपात**—ब्रिटिश ओव्हरसीज एअरवेज कॉर्पोरेशन आपल्या कांहीं मार्गांवरील भाड्याचे आकार कमी करणार आहे. वेस्ट इंडीज, आफ्रिका व अतिपूर्वेकडील मार्गांच्या भाड्यांतहि कपात होईल. ब्रिटनच्या वाहतूकमंत्र्यांनीं कॉर्पोरेशनला तशी परवानगी दिली आहे. सध्यांच्या भाड्यापेक्षा नवे भाड्याचे आकार १० ते २० टक्के कमी असतील.

**पोरबंदर बंदराचा विकास**—भारत सरकारच्या वहातूकखात्याकडे पोरबंदरचा विकास घडवून आणण्यासाठी तेथील नागरिकांतर्फे अर्ज करण्यांत आला आहे. पोरबंदर येथून शेंकडों वर्षे चालणारा व्यापार, औद्योगिकदृष्ट्या बंदराचें महत्त्व व सध्यांची अडचणीची परिस्थिति, ह्याची तपशीलवार माहिती अर्जांत देण्यांत आली आहे. बंदराच्या विकासासाठी ४ कोटी रुपयांची मागणी करण्यांत आली आहे.

**आपत्ति निवारणासाठी कायदा**—डिसेंबरच्या २ तारखेला फ्रान्समधील एक धरण एकाएकीं फुटून ३०० पेक्षा अधिक माणसें दगावलीं होतीं. ह्या माणसांत ज्यांच्या विवाहाचा तिथिनिश्चय झाला होता असें एक जोडपें होतें. दुर्दैवानें भावी पति अपघातांत बुडून मरण पावला ही आपत्ति ओळखून फ्रेंच नॅशनल असेंब्लीनें असा कायदा केला आहे कीं, ज्यांच्या वाङ्निश्चयाला व विवाहाच्या तिथीला रीतसर प्रसिद्धि देण्यांत आली होती. त्यांचे विवाह ठरल्याप्रमाणें पार पडले असें समजण्यांत यावें.

# अर्थ

बुधवार, ता. ३० डिसेंबर, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


### पूर्व जर्मनीशीं व्यापार करण्याचा करार

पूर्व जर्मनी आणि भारत ह्यांच्या दरम्यान नवा व्यापारी करार करण्यांत आला आहे. कराराची मुदत १ जानेवारी १९६० पासून तीन वर्षांची ठेवण्यांत आली आहे. ह्यापूर्वी करण्यांत आलेल्या कराराची मुदत चालू वर्षअखेर संपत आहे. पहिला करार ऑक्टोबर १९५६ मध्यें करण्यांत आला होता व त्यांत १९५८ च्या नोव्हेंबरमध्यें कांहीं दुरुस्त्या करण्यांत आल्या होत्या. नव्या कराराप्रमाणें उभयतां देशांतील आयात-निर्यात शक्यतों समतोल राखण्याचा प्रयत्न करण्यांत येईल. त्याचप्रमाणें व्यापारी व बिगर-व्यापारी असे जे सौदे उभयतां देशांत करण्यांत येतील त्याबद्दलचीं देणीं-घेणीं बदला न करतां येणाऱ्या रुपयाच्या चलनांत करण्यांत येतील. भारत लोखंडाचें खनिज व मँगेनीझचें खनिज ह्यांची निर्यात, निर्यातीच्या परंपरागत वस्तू म्हणून करीलच. पण त्याशिवाय चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ, काजू बिया, सुती कापड, तयार कपडे, तागाच्या वस्तू, काथ्याचा माल, हस्तव्यवसायाचा माल, खेळाचें सामान, डबाबंद फळें, बूट, इत्यादि माल निर्यात करणार आहे. उलटपक्षीं, पूर्व जर्मनी भारताला निर्यात करणार असलेल्या मालांत पुढील मालाचा समावेश आहे. कापड-गिरण्यांची यंत्रसामुग्री, छापखान्यांची यंत्रसामुग्री, यांत्रिक हत्यारें, कच्ची फिल्म, खतें, इत्यादि. भारताकडून निर्यात करण्यांत येणाऱ्या मालांत अजूनहि मुख्यतः कच्चा माल आणि रोज खपाच्या वस्तू ह्यांचाच भरणा अधिक आहे. पूर्व जर्मनीकडून येणाऱ्या मालांत मात्र यंत्रसामुग्रीचा अधिक भरणा आहे. ह्यावरून पश्चिम जर्मनीच्या मानानें औद्योगिकदृष्ट्या मागें असलेला पूर्व जर्मनीहि भारताला औद्योगिक विकासांत साह्य करू शकतो हें दिसून येतें.

---

### खनिज तेलाबाबतच्या धोरणाबद्दल खुलासा

भारत सरकारच्या खाणी व तेल खात्याचे मंत्री श्री. के. डी. मालवीय ह्यांनीं खनिज तेलाच्या शोधाबाबतच्या व हा धंदा सार्वजनिक विभागांत ठेवण्याबद्दलच्या सरकारच्या धोरणाचा खुलासा केला आहे. पोलाद, खाणी व खनिज तेल ह्यासंबंधीं सरकारला अनौपचारिक सल्ला देण्यासाठी लोकसभेची जी समिति आहे तिच्या सभासदांपुढें श्री. मालवीय बोलत होते. ते म्हणाले कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारताला १·२ कोटी ते १·४ कोटी टन खनिज तेलाची निर्मिति करावीच लागेल. एवढें उत्पादन करण्याची पात्रता येण्यासाठी भारताला ८०० ते ९०० कोटी रुपयांचें भांडवल गुंतवावें लागणार आहे. सरकारनें तेलाचा धंदा हा सार्वजनिक विभागासाठी राखून ठेवलेला आहे. तरीसुद्धां तेलाचा शोध करण्यासाठी परदेशी कंपन्यांचें साह्य घेण्याचा निर्णय सरकारनें घेतलेला आहे. तेलाच्या उत्पादनाच्या बाबतींत भारतानें आपला विकास करून घेतला नाहीं तर सर्वच सार्वजनिक विभाग धोक्यांत येण्याचा संभव आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. तेलाच्या खाणी शोधण्यासाठी प्रचंड भांडवल लागणार आहे हें तर खरेंच; पण हा शोध करण्यासाठी निदान ३६ तज्ज्ञांची भारताला जरूर आहे. तेलखाणींच्या बाबतींत सरासरीचा नियम इतर कोठल्याहि क्षेत्रापेक्षा अधिक प्रमाणांत लागूं होतो. मोठ्या परदेशी कंपन्या तेलाच्या शोधाच्या बाबतींत सहकार्य करूं लागल्या म्हणजे लोकांच्या हिताला बाध येईल, अशी शंका कांहीं सभासदांनीं व्यक्त केली आहे. परदेशी कंपन्यांना तेलाच्या शोधाबाबत सहभागी करणें सरकारच्या धोरणाशीं सुसंगत नाहीं असेंहि त्यांचें म्हणणें आहे. तथापि, तेलधंद्याबाबतच्या धोरणांत सरकार कधींहि मागें पाऊल घेणार नाहीं.

---

### हातमागाच्या कापडाची अमेरिकेंतील लोकप्रियता

भारतांत, विशेषतः मद्रासमध्यें, तयार होणाऱ्या हातमागाच्या कापडाला अमेरिकेंत चांगली लोकप्रियता लाभली आहे. हें कापड मुख्यतः खेळण्याच्या वेळीं घालावयाच्या कपड्यांसाठीं अमेरिकेंत वापरलें जातें. प्रथम ह्या प्रकारचें कापड छोट्या दुकानांतूनच फक्त विक्रीसाठी ठेवण्यांत येत असे. पण अलीकडे अमेरिकेंत प्रसिद्ध असलेल्या प्रचंड 'डिपार्टमेंट स्टोअर्स' मधूनहि तें ठेवण्यांत येऊं लागलें आहे. एखाद्या वस्तूची लोकप्रियता अजमाविण्याचें हें एक साधन अमेरिकेंत मान्यता पावलेलें आहे. हातमागाच्या कापडासाठी वापरण्यांत येणारे वनस्पतिजन्य रंग, कपडा भट्टीला दिला कीं एकमेकांत मनोहारक रीतीनें मिसळतात व त्यामुळें त्याची शोभा अधिकच खुलते असें मत अमेरिकेंतील दुकानदारांनीं व्यक्त केलें आहे. इतर प्रकारचे रंग अशा रीतीनें परस्परांत मिसळत नाहींत. कापडाच्या उत्पादकांनीं हा मुद्दा लक्षांत घेण्यासारखा आहे. गेल्या कांहीं वर्षांत भारतामधील हातमागाच्या कापडाचें उत्पादन खूप वाढलें आहे. १९५२ सालीं हातमागावर ११० कोटी वार कापड निर्माण करण्यांत आलें. चालू वर्षी हातमागाच्या कापडाचें उत्पादन १८० कोटी वारांपर्यंत जाईल असा अंदाज करण्यांत आला आहे. हातमागावरील उत्पादनाला सरकार प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या उत्तेजन देतें त्याचा हा परिणाम आहे. गिरण्यांतील कापडावर अबकारी व इतर कर घेण्यांत येतात; पण हातमागाचें कापड त्या करापासून मुक्त आहे. हातमागाचा धंदा झपाट्यानें वाढला आहे हें खरें; पण अजूनहि तो सुस्थिर व बळकट पायावर उभा राहिला आहे असें म्हणतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें हातमागाच्या धंद्यांत गुंतलेल्या विणकरांची परिस्थितीहि फारशी सुधारलेली दिसत नाहीं. उत्पादनाची वाढ झाली असली तरी ह्या गोष्टी साध्य झालेल्या नाहींत.

---

### बँक ऑफ बिकानेर स्टेट बँक ऑफ बिकानेर बनली

दि बँक ऑफ बिकानेर, लि. ही स्टेट बँक ऑफ इंडियाची सबसिडिअरी ह्या नात्यानें १ जानेवारी, १९६० पासून काम करील. तिचें नवें नांव स्टेट बँक ऑफ बिकानेर, असें राहील.

## छोट्या व मध्यम उद्योगधंद्यासाठी कर्जे

### फायनान्शिअल कॉर्पोरेशननें एजंट बँकांची केलेली नियुक्ति

### महाराष्ट्र बँकेची निवड

मुंबई राज्यांतील मध्यम व छोट्या उद्योगधंद्यांकडून कर्ज मिळण्यासाठी आलेल्या अर्जांचा विचार करण्यासाठी मुंबई राज्य फायनान्शिअल कॉर्पोरेशननें २१ डिसेंबर १९५९ पासून सात वर्गीकृत बँकांची एजंट म्हणून नेमणूक केली आहे. या बँका पुढीलप्रमाणें आहेत:—दी देवकरण नानजी बँकिंग कंपनी, लिमिटेड, दी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लिमिटेड, दी बँक ऑफ बरोडा लिमिटेड, दी युनायटेड कमर्शिअल बँक लिमिटेड, दी बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, दी कॅनरा बँक लिमिटेड आणि दी पंजाब नॅशनल बँक लिमिटेड.

स्टेट बँक ऑफ इंडिया ही १९५८ पासूनच कॉर्पोरेशनची एजंट म्हणून काम करीत आहे.

एजन्सीच्या या व्यवस्थेनुसार वरील सात बँकांच्या सर्व मुंबई राज्यांतील शाखा छोट्या व मध्यम उद्योगधंद्यांकडून कर्जासंबंधींचे अर्ज स्वीकारतील आणि त्यामधील प्रत्येक प्रस्तावाची छाननी करून कॉर्पोरेशनकडे विचारार्थ पाठवितील. खेळत्या भांडवलासाठी अल्प मुदतीच्या कर्जासंबंधीं एखादा अर्ज असल्यास संबंधित बँक त्याचा विचार परभारें करील. खेळत्या भांडवलासाठी मध्यम अथवा दीर्घ मुदतीच्या कर्जासंबंधींचा अर्ज असल्यास सदर बँका त्याची योग्य ती छाननी करून त्यावर विचार करील व अधिक विचारासाठी तो कॉर्पोरेशनकडे पाठवील. या बँका कर्जाचें वांटप करण्याच्या आणि त्यावरील व्याजाचे अथवा मुद्दलाचे हप्ते गोळा करण्याच्या बाबतींत कॉर्पोरेशनचे एजंट म्हणून काम करतील. त्याचप्रमाणें कॉर्पोरेशनच्या वतीनें त्या वेळोवेळीं तपासणीचें कामहि करतील.

राज्यांतील लहान व मध्यम उद्योगधंद्यांना कर्जासंबंधीच्या त्यांच्या गरजांसाठी एकाच प्रमुख संस्थेकडे जातां यावें व कॉर्पोरेशनला स्थानिक एजंट बँकांमार्फत आपल्या घटकांवर नीट देखरेख ठेवतां यावी म्हणून वरील एजन्सीची व्यवस्था करण्यांत आली आहे.

राज्यांतील लहान व मध्यम उद्योगधंद्यांची वाढ वा पुनर्रचना करण्यासाठी अथवा नवीन उद्योगधंदे चालू करण्यासाठी मुंबई राज्य फायनान्शिअल कॉर्पोरेशन पैसा पुरविते. याबाबत तयार करण्यांत आलेल्या नियमानुसार जुन्या उद्योगधंद्यांची वाढ अथवा पुनर्रचना करण्यासाठी किंवा नवीन उद्योगधंदे चालू करण्यासाठी १०,००० रुपयांपासून १०,००,००० रुपयांपर्यंत रक्कम देण्यांत येते. तसेंच याच कारणासाठी कॉर्पोरेशनकडून १०,००० ते ७५,००० रुपयांपर्यंत किंवा अपवादात्मक प्रकरणांत १,००,००० रुपयांपर्यंतहि कर्जेसुद्धां देण्यांत येतात. उद्योगधंद्यांना सरकारी रीत्या मदत करण्यासंबंधीच्या नियमाखालीं राज्यसरकारचे एजंट म्हणूनहि कॉर्पोरेशन वरील कर्जे अथवा मदत सढळ अटींवर देते.

कॉर्पोरेशननें आतांपर्यंत १९८ उद्योगधंद्यांना एकूण सुमारें ४,१६,९०,००० रुपयांचीं कर्जे मंजूर केलीं, तर सरकारचे एजंट म्हणून १०१ छोट्या उद्योगधंद्यांना सुमारें ४०,७२,५०० रुपयांचीं कर्जे मंजूर केलीं. याशिवाय सरकारनें पूर्वी ४५ छोट्या उद्योगधंद्यांना दिलेल्या १८,७३,५०० रु. कर्जाच्या बाबतींतहि कॉर्पोरेशन देखरेख करते.

मुंबई राज्यांतील छोट्या व मध्यम प्रमाणावरील उद्योगधंद्यांना कॉर्पोरेशननें देऊं केलेल्या सढळ सवलतींचा फायदा घेतां येईल. त्याचप्रमाणें आपल्या कर्जविषयक गरजांसाठी त्यांना युनायटेड इंडिया बिल्डिंग, १ ला माळा, सर फिरोजशहा मेहता रोड, फोर्ट, मुंबई १ येथील कॉर्पोरेशनच्या मुख्य कचेरीकडे वा राजकोट (विजय कुंज, जुनागड रोड) आणि नागपूर (नॅशनल इंडियन बिल्डिंग, माऊंट रोड, एक्स्टेंन्शन) येथील तिच्या शाखाकचेऱ्यांकडे अथवा ग्रामीण विभागांतील तिच्या एजंट-वर्गीकृत-बँकेकडे अर्ज करतां येईल.

---

**अमोनिअम सल्फेटचें उत्पादन**—भिलई येथील पोलादाच्या कारखान्यांत आतां अमोनिअम सल्फेटचें उत्पादन होऊं लागलें आहे. पोलादाच्या कारखान्यांतून वायां जाणाऱ्या वायूपासून उपपदार्थ म्हणून वरील खताचें उत्पादन करण्यांत येत आहे. भिलईच्या कारखान्यांतून दरसाल सुमारें १६,००० टन अमोनिअम सल्फेटचें उत्पादन होईल.

**नेपाळमध्यें सिगारेटचा कारखाना**—नेपाळच्या सरकारनें एका कारखानदाराला सिगारेटचा कारखाना काढण्याचा परवाना दिला आहे. कारखाना काटमांडूजवळ काढण्यांत येणार असून त्यांत दररोज एक लाख सिगारेटस तयार करण्यांत येतील. नेपाळची सिगारेटसची सर्व गरज कारखाना भागवूं शकेल. उभारणीच्या कामास प्रारंभ झाला आहे.

**मद्रास राज्यांत पोलादाचा कारखाना**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत काढावयाच्या पोलाद कारखान्याचा विचार भारत सरकार करीत आहे. ह्या कार्यक्रमांत मद्रास राज्यांत पोलादाचा कारखाना काढण्यांत येण्याचा संभव आहे. सालेम व नेवेली भागांत सांपडणाऱ्या लोखंडाच्या खनिजाचा कारखान्यासाठी उपयोग करण्यांत येईल.

---


चालू रौप्य महोत्सवी वर्षांत

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

मध्यें आपलें खातें उघडून तिच्या यशांत सहभागी व्हा.

—: भांडवल :—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ३१,००,०००चे वर |
| गंगाजळी व इतर निधी | रु. १३,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. तेरा कोटींचे वर |

संचालक मंडळ:

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे श्री. भा. म. गुत्ते
श्री. फ. दो. पदमजी श्री. म. स. पारखे
श्री. म. बा. जांभेकर श्री. वि. सी. शिरगांवकर
श्री. मा. वी. शहा श्री. ज. के. रेगे
श्री. र. भि. बांठिया

विशाल महाराष्ट्र, आंध्र व म्हैसूर राज्यांत बँकेच्या ५१ शाखा असल्यानें व्यवहारांत सुकरता.

बँकिंग क्षेत्रांतील विविध सेवांचा लाभ घ्या.

मुख्य कचेरी बाजीराव रोड, पुणें २.

चिं. वि. जोग, बी. कॉम्., एफ. आय. बी. [लंडन] मॅनेजर.

## रेल्वे-स्टेशनावर हमाली करणाऱ्या स्त्रिया

'स्त्रियांचीं कामें' व 'पुरुषांचीं कामें' असे शब्दप्रयोग अजून प्रचारांत असले तरी उद्योगप्रधान युगांत हा फरक नाहींसा होऊं लागलेला आहे. रशिआ व चीनसारख्या कम्युनिस्ट देशांत भारी कष्टाचीं अवघड कामें सोडून इतर सर्व क्षेत्रांत स्त्रियांचा प्रवेश झालेला आहे. इंग्लंड, अमेरिका इत्यादि देशांतूनहि स्त्रिया अशा अनेक क्षेत्रांतून कामें करीत आहेत कीं जीं क्षेत्रें पूर्वी फक्त पुरुषांचीं अनेक राखीव कुरणें समजलीं जात. दुसऱ्या महायुद्धानंतर भारतामधील मध्यमवर्गीय स्त्री ही कांहींशी हौसेनें व बरीचशी परिस्थितीनें घराबाहेर पडली व पुरुषांच्या व्यवसाय-क्षेत्रांवर तिनें आक्रमण केलें. ज्याला खालचा वर्ग असें समजतात त्या वर्गातील स्त्रिया मोलमजुरीचीं कामें भारतांतहि करीत असतातच. आतां एका नव्या क्षेत्रांत स्त्रियांनीं पदार्पण केलें आहे. रेल्वेस्टेशनावर हमाल म्हणून काम करण्यासाठी निरनिराळया विभागीय रेल्वेअधिकाऱ्यांकडे अर्ज येऊं लागले आहेत. रेल्वे खात्यानें ह्यासंबंधीं माहिती जमविली असतां असें आढळून आलें कीं, आठ विभागीय रेल्वेपैकी तीन विभागीय रेल्वेमार्गावर ५०० स्त्री-हमाल काम करीत आहेत. पश्चिम रेल्वे, आग्नेय रेल्वे आणि उत्तर रेल्वे ह्या विभागांत वरील स्त्रिया आढळून आल्या. सर्वांत अधिक स्त्री-हमाल पश्चिम रेल्वेवर आहेत. त्यांची संख्या ३४० आहे. आग्नेय रेल्वेमार्गावर १५० स्त्री-हमाल आहेत. उत्तर रेल्वेवर अवघ्या १० स्त्री-हमाल आहेत. इतर पांच विभागीय रेल्वेवर स्त्री-हमाल अद्याप तरी नाहींत. भावनगर ह्या एकाच रेल्वेस्टेशनावर ४५ स्त्रिया हमालाचें काम करीत आहेत. रेल्वे हमालांच्या संघटना आतां बऱ्याच ठिकाणीं आढळतात. स्त्रिया मोठ्या संख्येनें रेल्वे-हमाल झाल्यास ह्या संघटनांवर काय परिणाम होईल?

---

## पंधरा वर्षे मुदतीचीं नवीं ॲन्युइटी सर्टिफिकिटें

दरमहा २५, ५०, १०० व २०० रुपये मिळण्यासाठी १९५७ मध्यें काढलेल्या प्रचलित ॲन्युइटी सर्टिफिकिटांच्या जोडीस आतां १,३३० रुपये गुंतविले असतां पंधरा वर्षे दरमहा १० रुपये उत्पन्न मिळवून देणारीं ॲन्युइटी सर्टिफिकिटें २ जानेवारी १९६० पासून मिळूं लागतील. १९५७ मध्यें काढलेल्या प्रचलित सर्टिफिकिटांस लागू असलेले नियम व अटी याहि सर्टिफिकिटांस लागू होतील. या सर्टिफिकिटांत १,३३० रु. गुंतविल्यानें १५ वर्षे दरमहा १० रुपये मिळतील. पैसे गुंतविल्यास एक कॅलेंडर महिना पुरा झाल्यानंतर हे १० रुपये मिळूं लागतील. या उत्पन्नावर प्राप्तीकर आणि सुपरटॅक्स माफ आहेत आणि प्राप्तीकर आकारणीसाठी सर्टिफिकिटें धारण करणाऱ्याच्या एकूण उत्पन्नांत त्याचा अंतर्भाव केला जाणार नाहीं. या सर्टिफिकिटांवर दरसाल दर शेकडा ४·२५ टक्के दरानें चक्रवाढ व्याज मिळेल. हीं सर्टिफिकिटें खरेदी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या बंगलूर, मुंबई, नागपूर, मद्रास, नवी दिल्ली व कलकत्ता येथील कचेऱ्या आणि स्टेट बँक, स्टेट बँक ऑफ हैदराबाद व बँक ऑफ म्हैसूर यांच्या सरकारी ट्रेझरीचा व्यवहार करणाऱ्या कचेऱ्या, तसेंच ट्रेझरी व सबट्रेझरी यांजकडे अर्ज करावेत. सदर ॲन्युइटी सर्टिफिकिट त व्यक्तीस कमाल २६,६०० रुपये व दोघांस संयुक्तरीत्या ५३,२०० रुपये रक्कम गुंतवितां येईल.

---

## अमेरिकेंतील शेतीची आंकडेवार माहिती

| | |
|---|---|
| शेतांची संख्या | ४८,००,००० |
| शेतांवरील कामगार (पगारी कामगारांसह) | ७५,००,००० |
| एकंदर शेत-जिंदगी (यंत्रें, गुरेंढोरें, पिकें वगैरे) | २,००,००,००,००,००० डॉलर |
| पिकांखालील क्षेत्र | १३,००,००,००० हेक्टर्स |
| प्रमुख पिकें | ५९ |
| शेती करणाऱ्यांचे आणि पगारी शेत कामगारांचें नक्त उत्पन्न | १६,००,००,००,००० डॉलर |
| प्रत्येक शेतामागें सरासरी अंदाजिक उत्पन्न | ४,५०० डॉलर |
| मका पीक | ९,५०,००,००० मेट्रिक टन |
| गहूं पीक | ४,००,००,००० ,, |
| ओट पीक | २,१०,००,००० ,, |
| सरगम धान्य पीक | १,५०,००,००० ,, |
| सोयाबीन पीक | १,४५,००,००० ,, |
| ब्रॉयलर्सची (दहा आठवडे वयाच्या कोंबड्या) संख्या | १,६६,००,००,००० |
| दूध-उत्पादन | ५६,००,००,००,००० लिटर्स |
| अंडीं | ६०,००,००,००,००० |
| ट्रॅक्टर्सची संख्या | ४७,००,००० |
| शेतांवरील मालवाहू मोटारींची संख्या | ३०,००,००० |
| शेतांवरील मोटारींची संख्या | ४२,६०,००० |

---

### माणशीं दर तासीं उत्पादन
### सन १९१८ पासून झालेली प्रगति

| वर्ष | सन १९१८ पासून टक्के वाढ |
|---|---|
| १९२८ | १८ |
| १९३८ | ४० |
| १९४८ | ११० |
| १९५८ | २२५ |

---

### प्रत्येक हेक्टरमागें कांहीं प्रमुख पिकांच्या उत्पादनांत सन १९३८ ते १९५८ झालेली वाढ

| पीक | वाढ टक्के |
|---|---|
| मका | ८७ |
| गहूं | १०५ |
| सरगमधान्य | १५७ |
| कापूस | ९९ |
| ओटस | ४८ |
| तांदूळ | ५१ |
| साखर (बीट्स) | ३९ |
| तंबाखू | ८८ |


'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

## देशांतील कापड-पुरवठ्याची परिस्थिति

कापड गिरण्यांकडे आज विकला गेलेला व न गेलेला कापडाचा साठा २ लाख गांसड्यांहून थोडा जास्त आहे. १९५७ व १९५८ च्या मंदीच्या व गिरण्यांत पडून राहिलेल्या साठ्याच्या परिस्थितीशीं तुलना करतां ही परिस्थिति अतिशय समाधानकारक आहे. १९५७ अखेर गिरण्यांकडे ६ लक्ष ६० हजार गांसड्या कापड शिल्लक होतें. १९५८ चा हा आंकडा ५ लक्ष ६४ हजार ६४ हजार गांसड्यांवर आला. १९५८ च्या डिसेंबर महिन्यांत हा आंकडा ५ लक्ष ८२ हजार गांसड्या असा होता.

या परिस्थितींत झपाट्यानें सुधारणा होत आहे. १९५९ मध्यें ७५ कोटी वार म्हणजे गेल्या वर्षापेक्षा १५ कोटी वार कापडाची जास्त निर्यात होण्याचा अंदाज आहे. देशांतील कापडासाठी होणारी मागणी हळूहळू वाढत आहे. १९६० मध्यें यापेक्षा अधिक प्रमाणांत निर्यात होईल अशी आशा आहे. हा आंकडा सदर वर्षात १०० कोटी वारापर्यंत जाईल असें वाटतें.

अशा परिस्थितीमुळें कापड-पुरवठ्याच्या परिस्थितिबाबत एक प्रकारची भीतीची भावना निर्माण झाली असून उत्पादनाच्या सध्यांच्या वेगानुसार पुढील पांच महिन्यांत गिरण्यांकडे फक्त ७६ हजार गांसड्या कापड शिल्लक राहील असें म्हणण्यापर्यंत कापड व्यापार प्रतिनिधींची मजल गेली आहे.

सन १९६० चें उत्पादन किमान ५ टक्के तरी जास्त झालें पाहिजे ही गोष्ट अगदीं उघड आहे. तथापि तें १० टक्क्यांहून अधिक होण्याची आवश्यकता नाहीं. प्रत्यक्ष उत्पादन किती व्हावें तें देशांतील गरजेवर अवलंबून राहील. कापडाचा तुटवडा पडणार नाहीं आणि ग्राहकांच्या सर्व गरजा भागून जनतेचें समाधान होईल अशा रीतीनें धंदा करणें ही जबाबदारी आतां या क्षेत्रांतील लोकांवर येऊन पडलेली आहे. कापसाचा पुरवठा नाहीं म्हणून उत्पादनास अडथळा येणार नाहीं असें स्पष्ट आश्वासन सरकारनें आपल्या परीनें दिलें आहे. या वर्षी कापसाचें उत्पादन कमी झाल्यामुळें गतवर्षापेक्षा जास्त प्रमाणांत कापसाची आयात करावी लागेल आणि सरकारला ही परिस्थिति आकलन झाली असून त्याप्रमाणें सरकार उपाययोजना करील. उपलब्ध कापूस ताब्यांत घेण्यासाठी व्यापाऱ्यांत स्पर्धा झाल्यामुळें कांहीं ठिकाणीं कापसाच्या किंमती कमाल किंमतीपेक्षाहि वाढून कांहीं गैरप्रकार झाले. यासंबंधांत कांहीं दिवसापूर्वीच कांहीं नियंत्रक उपाय जाहीर केले आहेत. कापूस सल्लागार मंडळाच्या बैठकींत, उपलब्ध कापूस, गिरण्यांस कोटा पद्धतीवर वांटण्यांत यावा या सूचनेस विरोध तर नाहींच, परंतु व्यापक पाठिंबा मिळाला. हे कोटे देतांना विशिष्ट विभागाच्या आणि खास गरजा यांकडे साहजिकपणें लक्ष देण्यांत येईल.

कोटा पद्धतीवर भारतीय कापसाचें वांटप करण्याची सूचना यापूर्वीच स्वीकारलेली आहे. आणि पुढील कांहीं दिवसांतच गिरण्यांस हे कोटे मिळतील. सुरुवातीला हे कोटे गिरण्यांच्या गेल्या वर्षींच्या खपाच्या ५० टक्के इतके देण्यांत येतील आणि बाजारपेठेंत कापूस आल्यावर आणि कापूस-उत्पादनाचें स्वरूप निश्चित झाल्यावर त्यांत क्रमशः वाढ करण्यांत येईल. याचबरोबर दर्जापाहणीहि सुरू करण्यांत येईल. या उपाययोजना प्रभावी होण्यासाठीं आवश्यक ते इलाज केले जातील. वरीलप्रमाणें नियंत्रक उपाययोजना केल्यावर हा धंदा कापड-उत्पादनांत वाढ करण्याच्या महत्त्वाच्या कार्यास लागेल आणि परिस्थितींत एकूणरीत्या सुधारणा होईल.

### बँक नोकरांच्या महागाई भत्त्यांत वाढ

१ जानेवारी, १९५९ पासून हिंदी व एक्सचेंज बँकांच्या नोकरांचा महागाई भत्ता वाढणार आहे. लेखनिकांचे बाबतींत तो ७·१४ रु. ते २६·३६ रु. होईल आणि कनिष्ठ नोकरांचे बाबतींत ४·२५ रु. ची वाढ होईल. ऑल इंडिया कंझ्युमर्स प्राइस इंडेक्स १६४ ला अनुसरून (१९४४=१००) ही वाढ केली जाईल व तिचा फायदा ७५,००० बँक नोकरांना मिळेल.

### विमान उत्पादन करणाऱ्या कंपन्यांचें एकत्रीकरण

विमानांचें उत्पादन करणाऱ्या दोन प्रचंड कंपन्यांचें (हॉकर सिडले व डि हॅविलंड) एकत्रीकरण होणार असल्याचें त्यांनीं एक पत्रक काढून जाहीर केलें आहे.

### परदेशी खासगी भांडवलाची भारतामधील गुंतवणूक

१९५७ चे मानानें १९५८ मध्यें भारतांत परदेशी खासगी भांडवलाची आयात कमी झाली. जागतिक बँकेचें २५ कोटी रुपयांचें कर्ज धरून, खासगी क्षेत्रांत ३५ कोटी रुपयांचें परदेशी खासगी भांडवल गुंतवलें गेलें; १९५७ मध्यें ही रक्कम ४८·८ कोटी रु. होती. पूर्वी पेट्रोलियमच्या धंद्यांत गुंतवणूक बरीच होत असे, ती १९५८ मध्यें रोडावली, इतकेंच नव्हें तर त्यांतील कांहीं रक्कम परदेशी रवाना झाली.

### इजिप्तला अमेरिकेचें टेलिव्हिजनसाठी कर्ज

युनायटेड स्टेट्स आणि युनायटेड अरब रिपब्लिक ह्यांचेमध्यें नुकताच एक करार झाला असून त्याअन्वयें अमेरिका यु. ए. आर. ला ४५ लक्ष डॉलर्स (सुमारें ६·१ कोटी रु.) टेलिव्हिजन सुरू करण्यासाठी कर्जाऊ देणार आहे.

### प्रत्येक शाळेंत रेडिओ ऐकण्याचा तास

प्रत्येक शाळेनें, शाळांसाठी ध्वनिक्षेपित केले जाणारे रेडिओ कार्यक्रम आपल्या मुलांना, अभ्यासक्रमाचाच एक भाग म्हणून ऐकविण्याची व्यवस्था करावी, असें ऑल इंडिया रेडिओनें राज्य सरकारांना सुचविलें आहे. त्याप्रमाणें, आंध्र व म्हैसूर राज्य सरकारांनीं हुकूम काढले आहेत. हायस्कुलें व मिडलस्कुलें ह्यांत आतां रेडिओसाठी तास राखून ठेवला जाईल व त्यावेळीं अनुक्रमें हैदराबाद, विजयवाडा व बंगलोर येथून ध्वनिक्षेपित होणारे रेडिओ कार्यक्रम मुलांना ऐकवण्याची व्यवस्था केली जाईल. शाळेच्या वेळांतच हे कार्यक्रम ध्वनिक्षेपित केले जातात.

### स्कूटर्सचें दुप्पट उत्पादन

स्कूटर्सचें वार्षिक उत्पादन ६,००० चें १२,००० करण्याचा कसून प्रयत्न भांडूप येथील ऑटोमोबाइल प्रॉडक्ट्स ऑफ इंडिया लि. चा कारखाना करीत आहे. सध्यां कारखान्यांत दररोज ४० स्कूटर्स तयार होतात.

### जपानी विद्यापीठाच्या ग्रंथशाळेला डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांची देणगी

राष्ट्राध्यक्ष, डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांनीं क्योटो (जपान) येथील ओहताना विद्यापीठाच्या ग्रंथशाळेला १० लक्ष येनची (सुमारें १३,००० रु.) देणगी दिली आहे. डॉ. राजेंद्रप्रसादनीं गेल्या वर्षी जपानला भेट दिली, त्यावेळीं ह्या विद्यापीठानें त्यांना डॉक्टरेटची सन्माननीय पदवी दिली होती; तेच ह्या विद्यापीठाचे पहिले सन्मान केलेले 'डॉक्टर' आहेत.

प्रपंचसुधा, १९६०

" जो प्रपंची अप्रमाण। तो परमार्थी खोटा " दासबोधांतील वचनाला शिरोभागीं धरून सा. ७ – – – साळवे, १९८ शुक्रवार, पुणें २ ह्यांनीं प्रस्तुत डायरी पुरवणीची पुस्तिका प्रकाशित केली आहे. " प्रापंचिकानें आर्थिक स्थैर्य हेंच जीवन मानलें पाहिजे. आलेल्या पैशांचा विचारपूर्वक विनियोग करणारांनाच आर्थिक स्थैर्य लाभत असतें. केलेल्या खर्चाचा हिशेब नेहेमीच्या पद्धतीनें मांडून त्याचा आढावा घेण्याच्या कामीं प्रपंचसुधेचें साह्य घेतलें असतां तें ज्ञान कुणालाहि होऊं शकेल. " असें प्रास्ताविकांत म्हटलेलें आहे.

प्रपंचसुधेंत प्रत्येक महिन्यासाठी जमाखर्चाच्या आढाव्याचे रकाने दिले असून अंदाजपत्रकाप्रमाणें उत्पन्नाचा खर्चासाठी योग्य तेवढाच भाग उपयोगिला जातो किंवा नाहीं, हें सहज कळावें अशी योजना केलेली आहे. शेवटीं, संपूर्ण वर्षातील जमाखर्चाच्या आढाव्यासाठी तरतूद आहे.

प्रपंचसुधा अंदाजपत्रक हें नमुन्यादाखल, १५० रुपयांच्या उत्पन्नावर आधारलेलें असून, त्यांत वेगवेगळीं खातीं, एकूण उत्पन्नाच्या खर्चासाठी योग्य भाग, १५० रुपयांच्या उत्पन्नाचा खर्चासाठी योग्य भाग, हीं छापलीं आहेत आणि आपल्या व्यक्तिगत उत्पन्नाच्या खर्चासाठी योग्य भाग लिहिण्यासाठी कोरा रकाना ठेवला आहे. प्रत्येकाला ह्या रकान्यांत स्वतःच्या परिस्थितीप्रमाणें योग्य ती रक्कम येथें लिहितां येईल आणि त्यावरून मार्गदर्शक असा आढावा काढतां येईल.

प्रपंचसुधेंत प्रापंचिकाची व्यक्तिगत माहिती, पोस्टखात्यामार्फत करावयाच्या व्यवहारासंबंधीं खास सूचना, शुभचिंतनपर तारांची माहिती, जुन्या व नव्या नाण्यांत रकमा मांडण्याची पद्धत, व्याजाचें कोष्टक, महिन्याच्या उत्पन्नावरून एका दिवसाचें उत्पन्न काढण्याचें कोष्टक, इत्यादि उपयुक्त माहिती दिली आहे. अशा रीतीनें, मोठ्या ध्येयवादानें ही प्रपंचसुधा तयार करण्यांत आली असून, तिच्या उपयुक्ततेच्या मानानें किंमत ( ३७ नये पैसे ) माफकच आहे.

प्रत्येक प्रापंचिकाला ही सुधा आर्थिक स्वास्थ्याचें हळुवारपणें मार्गदर्शन करील, ह्यांत संशय नाहीं. नवविवाहित वधूला शुभचिंतनाचे वेळीं देणगीमध्यें हळदी-कुंकवाची पुडी घालण्यांत येते; त्याला प्रपंचसुधेची जोड दिली तर ती कार्यप्रवण करील.

| वारी | खात्याचे नाव | खर्चासाठी योग्य भाग | खर्चासाठी योग्य भाग | ... खर्चासाठी योग्य भाग |
|---|---|---|---|---|
| | | | रु. न. पैसे | |
| (A) | गुंतवणूक | ·०२० | ३·०० | |
| (B) | कर्जफेड-हप्ता | ·०२० | ३·०० | |
| (C) | विमा-हप्ता | ·०२० | ३·०० | |
| (D) | गंगाजळी | ·०२० | ३·०० | |
| (E) | रोख रक्कम | ·०२० | ३·०० | |
| (F) | घरभाडें | ·१०० | १५·०० | |
| (G) | अन्नधान्यें | ·०७५ | ११·२५ | |
| (H) | कपडेलत्ते | ·०७५ | ११·२५ | |
| (I) | दूधदुभतें + अंडीं | ·०७५ | ११·२५ | |
| (J) | सरपण दिवाबत्ती | ·०५० | ७·५० | |
| (K) | चहासाखर, पेयें | ·०७५ | ११·२५ | |
| (L) | भाजीपाला | ·०५० | ७·५० | |
| (M) | मीठमसाला | ·०५० | ७·५० | |
| (N) | स्निग्ध पदार्थ | ·०५० | ७·५० | |
| (O) | कडधान्यें, मटन | ·०५० | ७·५० | |
| (P) | साफसफाई | ·०२५ | ३·७५ | |
| (Q) | औषधपाणी | ·०२५ | ३·७५ | |
| (R) | शिक्षण-शुल्क | ·०२५ | ३·७५ | |
| (S) | स्टेशनरी-वृत्तपत्रें | ·०२५ | ३·७५ | |
| (T) | दानधर्म | ·०२५ | ३·७५ | |
| (U) | करमणूक | ·०२५ | ३·७५ | |
| (V) | मोडतोड दुरुस्ती | ·०२५ | ३·७५ | |
| (W) | नोकरचाकर, हमाली | ·०२५ | ३·७५ | |
| (X) | प्रवास | ·०२५ | ३·७५ | |
| (Y) | छंद ( hobby ) | ·०२५ | ३·७५ | |
| (Z) | उधार-उसनवार | ·००० | ०·०० | |
| | | १·००० | १५०·०० | |

शेरा :–योग्य आणि प्रत्यक्ष खर्चातील अधिक (+) फरक म्हणजे खर्च योग्य असूनहि प्रत्यक्ष खर्च न झालेली रक्कम अर्थात् कायम स्वरूपाच्या गुंतवणुकीस अपात्र अशी शिल्लक योग्य आणि प्रत्यक्ष खर्चातील उणे (–) फरक म्हणजे अयोग्य असूनहि प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम. अर्थात् त्या त्या खात्यावरील खर्चात कपात अगर काटकसर करून फेडलेंच पाहिजे असें कर्ज रोजखर्ड्यांतील किंवा बिलांतील रकमांपुढें विल्हेवारींतील अक्षर लिहून खर्च झालेल्या रकमांचें प्रथम वर्गीकरण करून बेरीज घ्यावी. नंतर आढावा भरावा.

पाकिस्तानांतील गव्हावरील नियंत्रण—पश्चिम पाकिस्तानांत गव्हाच्या वांटपाची पद्धत पुढील सालच्या एप्रिल महिन्यापासून रद्द करण्यांत येणार असल्याचें पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यांनीं जाहीर केलें आहे. एप्रिलपासून गव्हाचा व्यापार खुला ठेवण्यांत येणार आहे. पश्चिम पाकिस्तानांतील एकूण ४ कोटी लोकसंख्येपैकी १५ टक्के लोक ह्या वांटपाच्या कक्षेंत आहेत. सुमारें १०० शहरांतून वांटपपद्धति सुरू आहे.

ऊंस लावणीसाठी नवें पेरणीयंत्र—लखनौ येथील ऊंस संशोधन संस्थेनें उसाची पेरणी करण्यासाठी एक नवें यंत्र शोधून काढलें आहे. ह्या यंत्राच्या साह्यानें तीन माणसें एका बैलजोडीच्या उपयोगानें २ एकर जमिनींत ८ तासांत उसाची लागवड करूं शकतील. सध्यांच्या पद्धतीनें २॥ एकर जमिनींत लागवड करण्यासाठी २४ माणसें व दोन बैलजोड्या ह्यांना ८ तास राबावें लागतें.

तेलशुद्धीच्या कारखान्याची यंत्रसामुग्री—भारताला पुरविण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्याच्या यंत्रसामुग्रीचें काम रशिआंतील कारखान्यांनीं सुरू केलें आहे. दरसाल २० लाख टन अशुद्ध तेल शुद्ध करण्याच्या दृष्टीनें यंत्रसामुग्री तयार करण्यांत येत आहे. तेलशुद्धीबरोबरच कारखाना इतर उपपदार्थांचेंहि उत्पादन करूं लागेल.

[illegible] धान्याची नासाडी होते. यावरून मालासाठी गुदामांची गरज किती तीव्र स्वरूपाची आहे याची कल्पना येईल. शेतकी मालाची ही नासाडी थांबवून ग्रामीण विभागांतील आर्थिक व्यवहारांत सुधारणा घडवून आणावी म्हणून सरकारनें गुदामें बांधण्याचा देशव्यापी कार्यक्रम आंखला आहे. धान्यादि शेतकी माल सांठवण्याची कार्यक्षम व्यवस्था, शेतकऱ्यांसाठी कर्ज मिळण्याची सोइस्कर सोय आणि शेतमालाला चांगला भाव मिळण्याची शक्यता असे तीन प्रकारचे लाभ या योजनेमुळें होऊं शकतील.

सदर कार्यक्रमास १९५६ मध्यें मध्यवर्ति गुदाम कॉर्पोरेशनच्या स्थापनेनें मूर्त स्वरूप मिळालें. आतांपर्यंत एकूण सुमारें ७ लक्ष मण धान्य सांठवितां येईल अशी एकूण १८ गुदामें बांधण्यांत आलेलीं आहेत. बहुतेक राज्यांतूनहि गुदाम कॉर्पोरेशनें गेल्याच वर्षी स्थापन झालेलीं असलीं तरी यंदाच्या सप्टेंबर अखेरीपर्यंत त्यांनीं ६५ गुदामें सुरू केलेलीं आहेत. चालू वर्षाच्या उरलेल्या काळांत मध्यवर्ति गुदाम कॉर्पोरेशन आणखी १० आणि राज्यांची गुदाम कॉर्पोरेशननें १२० गुदामें बांधणार आहेत. अशा प्रकारें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत देशांत एकूण ३५० गुदामें बांधण्यांत येतील व त्यांत ५५ लक्ष मण शेतकी माल सुरक्षित व चांगल्या स्थितींत ठेवण्याची सोय होईल.

### प्रारंभ

अमेरिका आणि कानडा या देशांत शेतकी माल सांठविण्याच्या गुदामांस राष्ट्रीय आर्थिक घडींत महत्त्वाचें स्थान आहे. कारण या सोयीमुळें शेतकी मालाची नासाडी होत नाहीं, शेतकऱ्यांची सोय होते व व्यापारास सामान्यतः एक प्रकारची हमी मिळते. भारतांत रिझर्व्ह बँकेनें १९५१ मध्यें नेमलेल्या ग्रामीण पतपाहणीसमितीनें गुदाम बांधणीचा कार्यक्रम देशव्यापी स्वरूपांत हातीं घेण्याची शिफारस केली होती व त्यानुसार संसदेनें १९५६ मध्यें ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस (डेव्हलपमेंट ॲण्ड वेअर हाउसिंग) कॉर्पोरेशन्स ॲक्ट हा कायदा संमत केला. या कायद्यांत मध्यवर्ति गुदाम कॉर्पोरेशन प्रत्येक राज्यांत गुदाम कॉर्पोरेशन तसेंच राष्ट्रीय सरकारी विकास व गुदाममंडळ या यंत्रणा स्थापन करण्याची तरतूद आहे.

### शास्त्रीयरीत्या सांठवण

या योजनेचें यंत्र निरनिराळ्या प्रकारच्या शेतमालाची योग्य रीतीनें सांठवण करण्यावर अवलंबून असल्यानें तो तो माल मिळालेल्या स्थितींतच मालकाच्या स्वाधीन करण्याकडे खास लक्ष पुरविलें जातें. जंतुनाशकांचा फवारा देणें, उंदरांचा बंदोबस्त करणें, धुरी देणें यासारखे कीडप्रतिबंधक उपाय योजण्यांत येतात. मात्र अशा जंतुनाशक रासायनिक द्रव्यांमुळें कोणताहि शेतमाल खराब होऊं नये याची दक्षता घेतली जाते. हवामानाच्या लहरींपासून, सांठविलेल्या मालाचें रक्षण व्हावें म्हणून गुदामांत खास प्रकारची बांधणी केली असते.

### खास सांठवणीची सोय

गुदामाची सोय करण्याच्या क्षेत्रांत नवीन गोष्टी करण्यासाठीं [illegible] पर्यंत आहेत. सध्यां गुदामांतून अन्नधान्य, [illegible]तीचीं धान्यें, गुरांची वैरण, कपाशी, सरकी, ताग, हळद, गूळ, आलें व मिरीं यांसुद्धां ५० प्रकारचा शेतकी माल सांठविण्याची सोय केलेली आहे. आणखी कांहीं माल सांठविण्याची सोय करण्याबाबत व्यवस्था चालू आहे. कोल्हापूर येथील मध्यवर्ति गुदामांत गूळ ठेवतां येण्याची आणि सांगली येथें हळद सांठविण्याची सोय यापूर्वीच करण्यांत आलेली आहे.

### कर्ज मिळण्याची सोय–मालाला अधिक चांगला भाव

गुदामांत शेतकी माल ठेवल्यानंतर गुदाम अधिकाऱ्याकडून मिळणारी पावती बँकेंत दिल्यावर, प्रत्यक्ष माल बँकेकडे न ठेवतांहि त्यावर त्यामानानें कमी व्याजानें कर्ज मिळूं शकतें. शेतकरी किंवा व्यापारी या कर्जाचा विनियोग व्यापारासाठीं किंवा शेतकीच्या कामासाठी करूं शकतो. इतकेंच नव्हे तर भाव चांगला असेल तेव्हां ही पावती खरेदीदारास देऊन माल त्यास विकूं शकतो अशा रीतीनें बाजारांत मालाची एरवीं होणारी उलाढाल कमी झाल्यानें त्याची खराबी होत नाहीं, वाहतूक–खर्च वांचतो, आणि आग, चोरी, पूर इ. आपत्तींवरील विमा उतरविल्यानें तो सुस्थितींत राहतो. गुदामांत ठेवलेल्या मालाची प्रतवारी ठरविली जाते. या प्रतवारीमुळें खरेदीदारास माल प्रत्यक्ष पाहावयास माल प्रत्यक्ष पाहावयास लागत नाहीं कीं नमुन्यावर विसंबून रहाण्याची गरज पडत नाहीं.

मध्यवर्ति गुदाम कॉर्पोरेशनचीं एकूण १९ गुदामें असून त्यांपैकी मुंबई राज्यांत ३ व मध्यप्रदेशांत १ गुदाम आहे. जून १९५८ मध्यें या निरनिराळ्या गुदामांतून ९७,५०० मण शेतमाल सांठविलेला होता. त्यांत वाढ होऊन सप्टेंबर १९५९ मध्यें हें मान ६,३६,००० मणांवर गेलें. सांठवणशक्तीहि २,५२,५०० मणांवरून वाढून ८,५२,५०० मणांवर गेली. या गुदामांकडून मिळालेल्या पावत्यांवर शेड्यूल्ड व सहकारी बँकांनीं जून १९५८ मध्यें १२,१०,००० रुपये कर्ज दिलें. सप्टेंबर १९५९ मधील हीच रक्कम सुमारें २ कोटी रुपये होती.

मध्यवर्ति गुदाम कॉर्पोरेशनचा कारभार संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखालीं चालतो. या मंडळांत राष्ट्रीय सहकारी विकास व गुदाम कार्यकारणीचे सर्व सभासद, सदर मंडळानें निवडलेले दोघेजण, स्टेट बँकेचा एक प्रतिनिधि, या कॉर्पोरेशनच्या शेअरहोल्डरचे चार प्रतिनिधि व राष्ट्रीय सहकारी विकास आणि गुदाममंडळानें नेमलेला मॅनेजिंग डायरेक्टर असे संचालक असतात. राज्य गुदाम कॉर्पोरेशनलाहि संचालकमंडळ असतें.

### भाग भांडवल

मध्यवर्ति गुदाम कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल २० कोटी रुपयांचें असून त्यांपैकी निम्में भांडवल जून १९५७ मध्यें विक्रीस काढण्यांत आलें होतें. राज्य कॉर्पोरेशनच्या भागभांडवलाचा भरणा मध्यवर्ति कॉर्पोरेशन व संबंधित राज्य सरकार समसमान प्रमाणांत करतात.

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९९५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.